# <u>विशेष प्रतिज्ञापत्र</u>

## (वसतिगृहात वास्तव्य करणा-या विद्यार्थी/विद्यार्थींनी करीता) :

1. कोठल्याही प्रकारचे विद्‌युत उपकरण **(Hot Plate/Electric Kettle, Iron/इस्त्री/स्पीकर)** वापरण्यास मनाई आहे. वसतिगृहात कोणतेही वाद्य किंवा खेळाचे साहित्य ठेवण्याची परवानगी नाही असे उपकरण सापडल्यास ते तत्काळ जप्त केले जाईल व परत मिळणार नाही.
2. वसतीगृहात वास्तव्य दरम्याण कोठल्याही प्रकारचे अन्न शिजविणे अथवा तयार करणेस मनाई आहे. असे आढळ्यास तात्काळ प्रवेश रद्द करण्यात येईल.
3. सर्व विद्यार्थी अथवा विद्यार्थींनी आपली रुम स्वच्छ व साफ ठेवणे आवश्यक आहे. घाण/केर कचरा आढळ्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
4. वसतीगृहात वास्तव्य करत असताना विडी, सिगरेट अथवा कोणत्याही प्रकारची, नशा दारु प्राशन करणे नियमबाह्य आहे. **असे वर्तन आढळ्यास तात्कळ पोलीस कारवाई करण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी**.
5. वसतीगृह सुरक्षा रक्षकास आपली बॅग तपासणी करण्याचे अधिकार आहेत. वसतीगृह सुरक्षा रक्षकाशी वादविवाद घालणे नियमबाह्य आहे व सहकार्य अपेक्षित आहे.
6. कॅम्पस सुरक्षा रक्षकांनी ओळख पत्र **(I-Card)** मागितल्यास सादर करणे अनिवार्य आहे. कॅम्पस सुरक्षा रक्षकाशी वादविवाद घालणे नियमबाह्य आहे व सहकार्य अपेक्षित आहे.
7. वसतीगृहात येण्याचे व बाहेर जाण्याचे सर्व नियम पाळणे आवश्यक व बंधनकारक आहे.
8. कुठल्याही प्रकारचे मारामारी/भांडण अथवा वसतीगृहातील सहकारी मित्र/मैत्रीणीला मानसिक/शारिरीक इजा पोहचविणे नियमबाह्य आहे. **असे वर्तन आढळ्यास तात्कळ पोलीस कारवाई करण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी**.
9. विद्यार्थी व विद्यार्थींनी यांना वसतीगृहात राहण्याची सुविधा या कारणास्तव दिलेली आहे की जेणेकरुन त्यांना वसतीगृहात राहुन महाविद्यालयातील वर्ग व प्रात्यक्षिके नियमीत पणे व वेळेवर हजर राहणे सोयीस्कर होईल.शिक्षकांच्या असे निर्दशन आले वसतीगृहात राहणारी विद्यार्थी व विद्यार्थींनी वारंवार गैरहजर राहतात विनाकारण अशा विद्यार्थ्यांच्या पालकांना कळविण्यात येईल व वसतिगृह प्रवेश रद्द करण्यात येईल.
10. **SPCE Lake** च्या बाजुला दिवसा अथवा रात्री फिरण्यास सक्त मनाई आहे.
11. वसतीगृह संसाधने **(Infrastructure)** यांचे जाणीवपुर्वक नुकसान अथवा गैरवापर/खराब केले असे चौकशी दरम्याण आढळयास दंडात्मक कारवाई करण्यात येईल/अथवा हॉस्टेल प्रवेश रद्द करण्यात येईल.
12. इंटरनेट/वायफाय यांचा वापर शैक्षणिक कारणांसाठीच आहे. **I.P.** ॲड्रेस संस्थेच्या सर्व्हेर वर असण्याकारणाणे सोशल मिडिया/**Online Game** इतर अनधिकृत संकेतस्थळ **(Website)** वापर करु नये, केल्यास **तात्कळ पोलीस कारवाई करण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी**.
13. कामा व्यतिरिक्त इतर सहाकरी मित्र अथवा मैत्रिाणीच्या खोलीत जाणेस सक्त मनाई आहे. समुहात **(Group)** एकत्र एका खोलीत येऊन गप्पा मारणे/आरडाओरड करणे/पार्टी करणे/वाढदिवस साजरा करणेस सक्त मनाई आहे.
14. रुम मधुन बाहेर पडताना फॅन व लाईट बंद करणे आवश्यक आहे.
15. सख्खा भाऊ/बहीण तसेच आई व वडील ह्यांस गरज असल्यास पुर्वपरवानगी (आधार कार्ड) घेऊन वसतीगृहात राहू शकतात. सख्खा भाऊ/बहीण आई व वडील सोडून इतर नातेवाईक व मित्र/मैत्रिण यांना वसतीगृहात राहता येणार नाही.

16. वसतीगृहात वासतव्यास असताना गिर्यरोहन, गडकिल्ले, सफारी/ट्रेकिंग/इंजॉयमेंट टुर करण्यास परवानगी नाही. या संदर्भात कॉलेज/अथवा वसतीगृह प्रशासन कुठल्याही प्रकारची जबाबादारी घेत नाही.
17. रंगपंचमी/होळी खेळणे/पाणी वाया घालविणे दिवाळीत फटाके फोडण्यास परवानगी नाही.
18. आपल्या घरी/बाहेरगावी जाण्याच्यावेळी सुट्टी अर्ज करुन जाणे बंधनकारक आहे. कोठलाही विद्यार्थी अर्ज न देता गेल्यास कारवाईस पात्र राहीलत.
19. हॉस्टेल गेट रात्री 10.30 वाजता बंद होतील व सकाळी 6.00 वाजता उघडेल.
20. गरम पाण्याचे गीझर सकाळी 6 ते 10 वाजेपर्यंत चालू राहतील. ह्या वेळेस विद्यार्थ्यांनी स्नान करुन घेणे अपेक्षित आहे. त्याच बरोबर सकाळी 9.00 वाजता पहिल्या तासिकेला **(Lecture)** हजर राहणे अनिवार्य आहे.
21. **Study Room** ला गेलेल्या विद्यार्थ्यांनी संध्याकाळी वसतीगृह मस्टर मध्ये नोंदणी (बाहेर जाण्याची वेळ व आत येण्याची वेळ रात्री 8.00 ते 12.00 मध्यरात्र) करणे गरजेचे आहे.
22. पदवी परीक्षा **(Final Year B.Tech)** पुर्ण झाल्यानंतर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना परत वसतीगृहात राहता येणार नाही.
23. प्रत्येक सत्र **(Semester Exam)** परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थी व विद्यार्थीना वसतिगृहात राहता येणार नाही. या संदर्भात कॉलेज/अथवा वसतीगृह प्रशासन कुठल्याही प्रकारची जबाबादारी घेत नाही.
24. रोज रात्री विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यात येईल. उशिरा येणारे व अथवा सांगुन न जाणारे विद्यार्थ्यांवर कारवाई करण्यात येईल.
25. कुठल्याही प्रकारचाआजार/त्रास असल्यास वसतीगृह व्यवस्थापनास कळविणे धनकारक आहे.
26. प्रत्येक सेमिस्टर (सत्र) परीक्षा निकाल लागल्यानंतर योग्य त्या नमुन्यामध्ये निकाल वसतीगृह प्रशासनास लिहुण देणे आवश्यक आहे.
27. वसतिगृहातील "नियम आणि नियमन" किंवा परीक्षेतील गैरप्रकारांच्या उल्लंघनात सहभागी असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्याचा भविष्यातील वसतिगृह प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही

वरील सर्व नियम मी वाचले आहेत आणि समजुन घेतले आहेत. आम्ही विद्यार्थी/विद्यार्थीनी आमच्या पालकांसह अशी ग्वाही देतो की वरील पैकी कोठलेही नियमांचे उल्लंघण केल्यास विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचा वसतिगृह प्रवेश रद्द करण्यात येईल हे आम्हांस मान्य आहे व यास महाविद्यालय अथवा वसतिगृह प्रशासन जबाबदार राहणार नाही. तसेच कोठल्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य केल्यास पोलीस कारवाई करण्यास महाविद्यालय अथवा वसतिगृह प्रशासन यांना परवानगी आहे व आमची काहीही हरकत नाही.

| | |
|---|---|
| विद्यार्थी - विद्यार्थीनी नाव / सही<br>पत्ता :<br><br><br><br>मोबाईल नं :<br>ई-मेल : | पालकांचे नाव / सही<br>पत्ता :<br><br><br><br>मोबाईल नं<br>ई-मेल : |